१९/५

# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
# जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

क्रं.रासनिप्रा/आस्था-२/निशाणी शाई/ /२०१५/३५६३ दिनांक३१ /०३/२०१५

## -:आदेश :-

**विषय : राज्य निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या व ग्रामपंचायतीच्या निवडणुकांच्या संदर्भात प्राधिकरणामार्फत करावयाच्या कार्यवाहीबाबत**

महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) अधिनियम २०१४ अन्वये राज्य सहकारी निवडणूक प्राधिकारणामार्फत राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्याबाबतची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोग, मुंबई यांनी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांचा कार्यक्रम दिनांक २४/०३/२०१५ रोजी जाहीर केला आहे. आयोगामार्फत घेण्यात येणा-या निवडणुकांची प्रक्रिया पार पाडीत असताना, मतदारांच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर न मिटणा-या शाईची निशाणी केलेली असते. सदरची मतदान केलेली निशाणीची शाई ब-याच कालावधीपर्यंत डाव्या हाताच्या तर्जनीवर राहते.

**तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) अधिनियम २०१४ चा नियम ४२(१) नुसार मतदाराच्या डाव्या हाताच्या अंगठयावर न मिटणारी शाई लावण्याची तरतूद आहे.**

**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणामार्फत घेण्यात येणा-या सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिये दरमान्य एकच व्यक्ती विविध/वेगवेगळया सहकारी संस्थांची सभासद तर असतेच परंतु मतदार देखील असू शकतो आणि अशा संस्थांची निवडणूक प्रक्रिया नजिकच्या कालावधीत येण्याचा संभव असतो. अशावेळी महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) अधिनियम २०१४ चा नियम ४२(१) नुसार प्रथम मतदान असणा-या संस्थेचे मतदान प्रक्रिये दरम्यान मतदाराच्या डाव्या हाताच्या अंगठयावर न मिटणा-या शाईची निशाणी केली जाते व ती लवकर नाहीशी होत नाही. अशा प्रकरणी नंतर लगेचच असणा-या दुस-या निवडणुकीच्या मतदानाच्या वेळेस सदर मतदाराच्या कोणत्या बोटावर शाई लावावी अशी संभ्रमावस्था निवडणुक यंत्रणेतील कर्मचा-यांच्या मनात उदभवू शकते ही बाब लक्षात घेवून प्राधिकरण खालीलप्रमाणे सुचना देत आहे.**

अशावेळी महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) अधिनियम २०१४ चा नियम ४२(३) मध्ये नमूद केले प्रमाणे इतर बोटास शाईची निशाणी करणेत यावी.

या आदेशाची काटेकोरपणे अमंलबजावणी होईल याची दक्षता घेणेत यावी.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, म.रा.पुणे यांचे आदेशानुसार.**

( डॉ.अे.बी.जोगदंड )
**सचिव**
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य पुणे.

प्रति :-

जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)

**प्रत- मा.आयुक्त, राज्य निवडणूक आयोग,मुंबई याना माहितीस्तव सस्नेह सादर.**

३६३ ✓